# निशाणी क्र.१ खालील आदेश

(अधिघोषीत दिनांक १२/०१/२०२३)

अर्जदार क्र.१ व २ यांनी त्यांच्या नावे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. सुफीया बेगम सैय्यद मिर यांचा दि.३०/०४/२०२१ रोजी मृत्यू झालेला आहे. अर्जदार क्र.१ सैय्यद हादी सैय्यद मिर व अर्जदार क्र.२ हा मयताचा मुलगा असुन अर्जदार क्र.२ गजाला फरहत मोहम्मद अब्दुल रहीम शेख ही मयताची मुलगी आहे. मयताचे पती सय्यद मिर सय्यद युनुस यांचा यापुर्वीच दि.०८/११/१९७८ रोजी मृत्यू झालेला आहे. परंतु सदरबाबत दस्तऐवज उपलब्ध नसल्याने अर्जदार क्र.१ यांनी त्याबाबतचे नि.क्र.१४ अन्वये शपथपत्र दाखल केलेले आहे.

३. अर्जदारांनी अर्जातील कथनांच्या सत्यतेसाठी अर्जदार क्र.१ सय्य्द हादी सय्यद मिर यांचे पुराव्याचे शपथपत्र (नि.क्र.०९), त्यांची आई मयत सुफीया बेगम सैय्यद मिर यांचे मृत्यू प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत (नि.क्र.१०), अर्जदार क्र.१ व २ यांचे आधार कार्डच्या साक्षांकीत प्रती (नि.क्र.११ व १२) इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. अर्जदार क्र.१ यांनी त्यांचे शपथपत्रात अर्जातील कथनांचा पुनरउल्लेख करून अर्जदारांच्या नावे कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्याची मागणी केली असून, अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. अर्जदारांनी अर्जाच्या अनुषंगाने न्यायालयामार्फत मराठी वृत्तपत्र 'पुण्य नगरी' या दिनांक २२/१०/२०२२ रोजीच्या अंकात जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आले. मात्र मुदतीत कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही.

५. वरील कागदपत्रांच्या अनुषंगाने माझे असे मत आहे की, अर्जदारांनी शपथेवर त्यांचे व्यतिरिक्त मयताला इतर कोणीही वारस नसल्याचे कथन केले आहे. तरी, अर्जदार क्र.१ व २ मयताचे वारस असून, त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणतीही हरकत प्राप्त झालेली नसल्यामुळे सदर प्रमाणपत्र देणे उचित ठरेल.

६. वरील सर्व बाबींचा एकंदरीत विचार करता, कायद्याची वारस प्रमाणपत्रा संदर्भातील स्थायी स्थिती लक्षात घेता सदर प्रमाणपत्र केवळ अर्जदार क्र. १ व २ हे मयताचे वारस असल्याचे याव्दारे प्रमाणीत करण्यात येते. परंतु, सदर प्रमाणपत्रान्वये वारसांचे कोणतेही हक्क अथवा अधिकार याव्दारे अर्जदारांना देण्यात येत नाही. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.१ सय्यद हादी सय्यद मिर व अर्जदार क्र.२ गजाला फरहत मोहम्मद अब्दुल रहीम शेख हे मयत सुफीया बेगम सैय्यद मिर यांचे मृत्यू पश्चात त्यांचे वारस असल्याबाबत न्यायालयाकडुन मान्यता देण्यात येते. त्यांची नावे विहित नमुन्यातील वारसा प्रमाणपत्र, त्यांनी आवश्यक ते न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर देण्यात यावे.

३. अर्जदारांनी सुरक्षिततेसाठी आजच्या तारखेचे मुल्यांकनाच्या रकमेचे बंधपत्र जातमुचलक्यासह वरील रक्कम न्यायालय आदेश करील तेव्हा न्यायालयात जमा करण्याकरीता निष्पादित करावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by DHANSHREE RAGHUNATH BHANDARI
Date: 2023.01.13 10:35:01 +0530

**(धनश्री आर. भंडारी)**

दिनांक – १२/०१/२०२३ दिवाणी न्यायाधिश (क. स्तर)

स्थळ – राजुरा राजुरा, जि. चंद्रपूर